| MHSN:05-003633-2022. | दाखल दिनांक | ०४.१०.२०२२. |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | ०६.१०.२०२२. |
| | **निकाल दिनांक** | **०५.०२.२०२५.** |
| | कालावधी | **०२वर्षे, ०३महिने, ३०दिवस** |

**निशाणी क्र.२०.**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग[न्यायालय क्र.०५],**
**इस्लामपूर, जि.सांगली, यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी कमलजीत मांगीलाल चंडालिया)**

न्यायनिर्णय घोषित दिनांक – **०५ फेब्रुवारी, २०२५.**
**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.११९८/२०२२)**

गुन्हा रजिस्टर क्रमांक **१९१/२०२२**,

पोलीस ठाणे – **कुरळप**. ता.वाळवा, जि.सांगली.

| | |
|---|---|
| **फिर्यादी/ तक्रारदार** | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>**पोलीस ठाणे कुरळप,**<br>ता.वाळवा, जि.सांगली. |
| **अभियोग पक्षामार्फत** | विशेष सरकारी अभियोक्ता – **विधीज्ञ श्रीमती एस.आर.पाटील.** |
| **आरोपी** | **आयाज वल्ली पटेल,**<br>वय – ४० वर्षे, व्यवसाय –दुकानदार,<br>रा. कुंडलवाडी, ता. वाळवा, जि.सांगली. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | **विधीज्ञ श्री.ए. वाय. पटेल.** |

## भाग ब
[Para 44 ii of Chapter VI of Criminal Manual]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २३.०९.२०२२. |
| फिर्याद दाखल दिनांक | २३.०९.२०२२. |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | ०४.१०.२०२२. |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | ०३.०२.२०२४. |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २२.०५.२०२४. |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | ०७.०१.२०२५. |
| न्यायनिर्णय दिनांक | ०५.०२.२०२५. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | ---- |

### आरोपीची माहिती –

| आरोपीचा अनु.क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील कलम | निर्दोष किंवा दोषी | देण्यात आलेली शिक्षा | खटल्यादरम्यान आरोपीने भोगलेल्या कारावासाचा कालावधी– कलम ४२८ फौ.प्र.स.करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आयाझ वल्ली पटेल. | सी.आर.पी.सी. कलम ४१ (१) (अ) प्रमाणे नोटीस पाठवली. | | भा.द.वि. कलम २७९ मो.वा.का. कलम १८४ अन्वये. | निर्दोष | – | – |

## भाग 'क'
[Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual]

**अभियोगपक्षातर्फे/ आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार.**

### अ. अभियोग पक्ष –

| अनुक्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | फत्तेसिंग श्रीराम पाटील. | फिर्यादी. | नि.क्र.१५. |
| सा.क्र.२ | आसिफ अमिर पटेल. | पंच साक्षीदार. | नि.क्र.१७. |

## ब. आरोपी (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)

| अनुक्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## क. न्यायालय – (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)

| अनुक्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाने / आरोपीने / न्यायालयाने सिध्द झालेली/निशाणी पडलेली कागदपत्रे

## अ. अभियोग पक्ष –

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | नि.क्र.P–16/PW1. | फिर्याद. |

## ब. बचावपक्ष –

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | D–1/DW1–निरंक | निरंक. |

## क. न्यायालयाने निशाणी दिलेली कागदपत्रे –

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | C–1/CW1–निरंक | निरंक. |

## ड. मुद्देमाल –

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | MO1–आर्टीकल | निरंक. |

## न्या य नि र्ण य

**(न्यायनिर्णय घोषित दिनांक – ०५ फेब्रुवारी, २०२५)**

**०१.** आरोपी हा भारतीय दंड संहितेचे कलम २७९ व मोटार वाहन अधिनियम १८४ नुसार खटल्यास सामोरे जात आहे.

## ०२. खटल्याची संक्षिप्त हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे–

दिनांक २३.०८.२०२२ रोजी फिर्यादी फत्तेसिंग श्रीराम पाटील पोलीस कॉन्स्टेबल व त्यांचे सहकारी हे वरीष्ठांच्या आदेशान्वये सरकारी वाहनाने गस्त घालीत असताना आरोपी हा त्याच्या ताब्यातील हिरोहोंडा मोटारसायकल नोंदणी क्रमांक एमएच–१०एएच–९३९५ ही तांदुळवाडी ते येलुर गावचे हद्दीत एनएच–४ हायवेवर विरुध्द दिशेने सायंकाळी ६.३० च्या वेगात बेदकारपणे व दुसऱ्याच्या जिवीतास धोका पोहोचेल अशा रितीने मोटारसायकल चालविताना मिळुन आला. फिर्यादीने आरोपीला थांबवले. पंचांसमक्ष त्याचे नाव, गाव विचारले व त्याच्या गाडीबाबतची कागदपत्रे तपासली. तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपी हा त्याच्या ताब्यातील वरील नमुद वाहन हे हयगयीने व निष्काळजीपणे चालवत होता. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

०३. सदर फिर्यादच्या आधारे प्रकरणाचा तपास **तपासिक अंमलदार श्री.ए.एस.पाटील, पोलीस नाईक** यांनी केला. तपासामध्ये त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. मी आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम हा भारतीय दंड संहितेचे कलम २७९ व मोटार वाहन अधिनियम १८४ अन्वये **नि.क्र.१४** वर आरोपीविरुध्द गुन्हयाचा गोषवारा नोंदविला. आरोपातील मजकूर आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचून व समजून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबूल केला व प्रकरण चालविण्याचे दर्शविले. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार आरोपीचा जबाब **नि.क्र.१९ वर** नोंदविण्यात आला. त्याच्या बचावात त्याने त्याच्याविरुध्द खोटी केस केल्याचे सांगितले.

०५. सदरील प्रकरण निर्णयास येण्यासाठी खालील मुद्दे निष्पन्न होतात. त्या

मुद्दयांसमोर मी माझे निष्कर्ष नोंदवून त्याखाली कारणमीमांसा केली आहे.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | सरकार पक्ष हे सिध्द करते का की, आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल नोंदणी क्र.एमएच-१०एएच-९३९५ ही सार्वजनीक रस्त्यावर भरधाव वेगाने व बेदरकारपणे, मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला गंभीर दुखापत अगर क्षती पोहचण्याचा संभव असेल अशा पध्दतीने चालविली व भा.द.वि. कलम २७९ प्रमाणे गुन्हा केला आहे? | नकारार्थी. |
| ०२ | सरकार पक्ष हे सिध्द करते का की, आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायल भरधाव वेगाने व बेदरकारपणे, हयगयीने, रस्त्यावरील परिस्थीतीकडे दुलर्क्ष करुन चालविली व मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | नकारार्थी. |
| ०३ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.०१ व ०२ करीताः-</u>**

**०६.** मुद्दे क्र.०१ व ०२ हे परस्परांशी संबंधीत असल्याने त्यांची कारणमीमांसा एकत्र केली आहे. साक्षीदारांच्या पुराव्याची चर्चा सुरु करण्यापूर्वी भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम २७९ सिध्द होण्याकरीता कोणत्या बाबी कायदयाने आवश्यक असतात हे पाहणे गरजेचे आहे. भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम २७९ मध्ये बेदरकारपणा किंवा हयगयीने चालक त्याच्या ताब्यातील वाहन रस्त्यावर चालवून

मनुष्याच्या जीवनास क्षती पोहचवित असतो. विधी न्यायानिवाडयामध्ये "बेदरकारपणा" व "निष्काळजीपणा" यांच्या विविध व्याख्या दिलेल्या आहेत. 'बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे वाहन चालविणे' म्हणजे काय याचा अर्थ खालीलप्रमाणे –

"निष्काळजीपणा" याचा अर्थ जे कर्तव्य करायला पाहिजे ते न करणे,
"बेदरकारपणा" याचा अर्थ जी गोष्ट करायला नाही पाहिजे ती करणे.

मोटार वाहन कायदा कलम १८४ सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाने हे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन, हयगयीने वाहन चालविले. सदर कायद्याच्या आवश्यक बाबी लक्षात घेवून वरील नमूद साक्षीदारांच्या पुराव्याची चर्चा करणे आवश्यक आहे.

**०७.** सरकार पक्षाने आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी केवळ २ साक्षीदार तपासले आहेत. सा.क्र.१ जो की, फिर्यादी आहे, त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, दि.२३.०९.२०२२ रोजी ते कुरळप पोलीस स्टेशन येथे कार्यरत असताना ते वरीष्ठांच्या आदेशान्वये सरकारी वाहनाने गस्त घालीत होते. ते तांदुळवाडी – येलुर रस्त्यावर असताना समोरुन आरोपी हा त्याची मोटारसायकल वेगात,बेदरकारपणे व इतरांच्या जिवाला धोका निर्माण होईल या प्रमाणे चालवत येत होता. आरोपीला पंचासमक्ष पकडुन त्यास त्याचे नाव विचारले. तसेच त्याच्या कागदपत्रांची पडताळणी केली. त्यानंतर कुरळप पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. फिर्यादीने फिर्याद **नि.क्र.P–16/PW1** सिध्द केली आहे. त्याने त्याच्या उलटतपासात हे कबुल केले आहे की, एनएच–४ महामार्ग हा दक्षिण उत्तर चालीचा आहे व सदर महामार्ग दुभाजकाने विभागलेला आहे. त्याने हे देखील कबुल केले आहे की, आरोपी हा कोणत्या दिशेने व कोणत्या रस्त्याने येत होता हे

फिर्यादमध्ये नमुद नाही.

०८. फिर्यादीने फिर्याद व त्याच्या साक्षमध्ये असे कथन केले आहे की, आरोपी हा रस्त्याच्या विरुध्द दिशेने गाडी चालवत येत होता. फिर्यादीने हे कोठेही नमुद केलेले नाही की, आरोपी हा कोणत्या रस्त्यावरुन व कोणत्या बाजुने येत होता. त्यामुळे आरोपी हा विरुध्द दिशेने गाडी चालवित होता हे केवळ फिर्यादीच्या साक्षीवरुन सिध्द होवु शकत नाही.

०९. याव्यतीरीक्त आरोपी हा सार्वजनिक रस्त्यावर भरधाव वेगाने व बेदरकारपणे वाहन चालवित होता हे सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाद्वारे कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. फिर्यादीच्या कथनानुसार सदरची घटना ही येलुर गावाच्या हद्दीत घडली आहे. सदरचा परिसर हा रहदारीचा परिसर असुन फिर्यादी व तपासिंक अंमलदार यांना स्वतंत्र साक्षीदार सहज उपलब्ध झाले असते, परंतु त्यांनी कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. केवळ साक्षीदार क्र.१च्या साक्षीवरुन हे संशयापलिकडे सिध्द होत नाही की, आरोपीने रस्तयाच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने व बेदरकारपणे वाहन चालविले.

१०. सरकारपक्षाद्वारे सा.क्र.०२ जो की, घटनास्थळ पंच आहे, त्यास देखील तपासण्यात आले. परंतु त्याने सरकार पक्षास मदत केलेली नाही. त्यामुळे त्याची साक्ष सरकार पक्षास उपयुक्त नाही. सदर प्रकरणामध्ये सरकार पक्षाने तपासलेले साक्षीदारांकडून आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकारचा पुरावा आलेला नाही. सरकार पक्षाकडून घेण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीवरुन आरोपीवरील आरोप हे विनाशंका सिध्द होत नाहीत.

११. फौजदारी प्रकरणामध्ये सरकार पक्षाने विनाशंका प्रकरण सिध्द करायचे

असते. या प्रकरणामध्ये साक्षीदारांच्या साक्षीवरुन हे संशयापलिकडे सिध्द झालेले नाही की, आरोपी हा सार्वजनिक रस्त्यावर रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने व बेदरकारपणे त्याच्या ताब्यातील वाहन चालवित होता. त्यामुळे मी मुद्दे क्रमांक ०१ व ०२ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.०३ नुसार खालील आदेश देत आहे.

## आदेश

१. आरोपी **आयाझ वल्ली पटेल** यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७४ च्या कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम २७९ व मोटार वाहन अधिनियम १८४ अंतर्गतच्या आरोपांतून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७४ च्या कलम ४३७-अ प्रमाणे वरिष्ठ न्यायालयात हजर होण्यासाठी रु.१५०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व रु.१५०००/- चा जामीन द्यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by KAMALJEET CHANDALIYA
Date: 2025.02.05 16:38:55 +0530

**इस्लामपुर.** **(कमलजीत एम.चंडालिया)**

**दिनांक ०५.०२.२०२५.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग [न्यायालय क्र.०५]**
**इस्लामपुर.**

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Kishori A. Chougule |
| Court Name | : | 5th J.M.F.C. Islampur. |
| Date of Judgment | : | 05.02.2025. |
| Judgment signed by Presiding Officer on | : | 05.02.2025. |
| Judgment uploaded on | : | 05.02.2025. |